मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

जा.क्र./ल. ले/१७१/सन 2025-26

फोर्ट, मुंबई 400 001 दिनांक: 21 /10/2026

प्रति,

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
5. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रामीण)/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
6. मा. संचालक, पर्यावरण विभाग, MCZMA
7. मा. आयुक्त / सह आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई/पनवेल/भिवंडी-निझामपुर, उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
8. मा. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण विभाग
9. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
10. सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
11. प्रादेशिक आधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
12. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)
13. श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती (NGO)
14. डॉ.महेश शिंदीकर, Applied dept.of Science, College of Engineering Pune.

विषय : कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 57 वी बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-1/पाणथळ समिती/ 165 दिनांक 24 / 09/2026

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 57 वी बैठक मंगळवार दिनांक 06/10/2026 रोजी मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५७ वी दिनांक ०६/१०/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

स्थळ :- जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, फोर्ट, मुंबई.

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली **कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५७ वी बैठक** आयोजित करण्यात आली. समितीचे सदस्य सचिव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व पाणथळ तक्रार निवारण समिती संदर्भात बैठकीच्या विषयसुचीनूसार जिल्हानिहाय आढावा घेतला.

सदर बैठकीस खाली नमूद अधिकारी व कर्मचारी **प्रत्यक्ष उपस्थित** होते तसेच काही अधिकारी **व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे** बैठकीत सहभागी झाले.

अ.क्र.	नाव	पद	कार्यालय
१	श्रीमती रुचल अग्रवाल भा.प्र.से.	मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त	विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन
२	श्रीमती मधुमिथा एस., भा.व.से.	सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक	कांदळवन कक्ष, मुंबई
३	श्री. बाप्पासाहेब धोरात	अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर	जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
४	श्री. शिवदास गुंड	अधीक्षक, मुंबई नगर भूमापन व भूमि अभिलेख	जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय
५	श्री. ज्ञानेश्वर राक्षे	विभागीय वन अधिकारी, कांदळवन	विभागीय वन अधिकारी,कांदळवन,उत्तर, अ.का
६	श्री. अनिल पंडित	प्रकल्प अधिकारी	बॉम्बे एनव्हारमेंट ऍक्शन गृप, मुंबई
७	श्री. अमोल कदम	उप विभागीय अधिकारी	उप विभागीय अधिकारी, ठाणे
८	श्री. लक्ष्मीकांत कोळेकर	पदनिर्देशित अधिकारी पी/व	बृमन्मुंबई महानगरपालिका
९	श्री. उदय झावरे	उप अधीक्षक	उप विभागीय अधिकारी पोलीस, रायगड
१०	श्रीमती मधुरिमा जांशी	SRO, MPCB	M.P.C. Board, Mumbai
११	श्री. राहुल सावंत	वरीष्ठ लिपीक	VSLR, Mumbai Office
१२	श्री. स्टॅलिन डी.	संचालक	वनशक्ती
१३	श्री. जगदीश वलंज्यूवाणी	उप अधीक्षक	मिठागरे विभाग, भांडुप
१४	श्री. ओ. पी. मीना	उप अधीक्षक	मिठागरे विभाग, वडाळा
		व्ही. सी.द्वारे उपस्थित अधिकारी / कर्मचारी	
१.	-	जिल्हाधिकारी, मुंबई शहर	जिल्हाधिकारी, मुंबई शहर
२	-	जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर	जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
३	-	जिल्हाधिकारी रत्नागिरी	जिल्हाधिकारी रत्नागिरी
४	-	मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे	मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
५	-	निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर	जिल्हाधिकारी, पालघर
६	-	ACP Co-ordination	ACP Co-ordination
७	-	Additional Commissioner	Additional Commissioner
८	-	CIDCO	CIDCO
१०	-	PI Security Palghar	
११	-	OFC	-
१२	-	RDC Raigad	-
१३	-	SP Thane Rupal	-
१४	-	SRO Ratnagiri	
१५		NIC Sindhudurg	
१६		Executive Engineer SW	
१७	श्री. सुधाकर Suradkar		

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

अ.क्र.	विषय	झालेली चर्चा व दिलेल्या सूचना/ निर्णय	कार्यवाही करणारी यंत्रणा
1	**पाणथळ क्षेत्राचे तयार करण्यात येणाऱ्या Brief Document** संदर्भात चर्चा	सदर विषयाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी पर्यावरण विभाग यांचेकडून **NCSCM मार्फत पाणथळ क्षेत्रांबाबत तयार करण्यात येणाऱ्या Brief Document** संदर्भात विचारणा करण्यात आली. तथापि, सदर बैठकीस संचालक, पर्यावरण विभाग उपस्थित नसल्याने याबाबत सविस्तर चर्चा होऊ शकली नाही. संचालक, वनशक्ती यांनी स्पष्ट केले की, **Brief Document तयार करणे हा सदर समितीच्या कार्यकक्षेतील विषय नसून, पाणथळ क्षेत्राच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार Wetland Atlas मध्ये समाविष्ट असलेल्या पाणथळ क्षेत्रांचे संरक्षण करणे तसेच पाणथळ क्षेत्रांशी संबंधित प्राप्त तक्रारींची दखल घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करणे हे समितीचे प्रमुख कार्य आहे,** त्यामुळे समितीच्या बैठकीमध्ये प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीचा नियमितपणे आढावा घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी **सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना Brief Document तयार करुन पाणथळाची क्षेत्रीय पडताळणी करण्याच्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.**	**संचालक, पर्यावरण विभाग व सर्व संबंधित जिल्हाधिकारी**
2	**समितीकडे प्रलंबित असलेल्या तक्रारीबाबत चर्चा.**	• **Wetland Atlas मध्ये समाविष्ट असलेल्या पाणथळ क्षेत्रांचे संरक्षण व तक्रारींवर आवश्यक कार्यवाही करणे हे समितीचे प्रमुख कार्य असल्याने,** सर्व संबंधित विभागांनी प्राप्त तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना समितीने सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्या. • सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांनी कोकण विभागातील एकूण 28 **तक्रारींबाबत संबंधित यंत्रणांकडून**	सर्व संबंधित यंत्रणा आणि सर्व संबंधित जिल्हाधिकारी

		कार्यवाहीबाबतचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून दिले. प्राप्त अहवालांमध्ये पाणथळ क्षेत्रामध्ये झालेल्या अनधिकृत भराव, डेब्रिज टाकणे, अतिक्रमण अथवा इतर अनियमिततेबाबत स्पष्ट व वस्तुनिष्ठ माहिती नमूद नसून, काही अहवालांमध्ये केवळ सदर क्षेत्रामध्ये कांदळवन आहे किंवा नाही? अशा स्वरूपाची माहिती देण्यात येत असल्याचे सांगितले.	

अ.क्र.	जिल्हा	प्रलंबित तक्रारी
1	मुंबई शहर	1
2	मुंबई उपनगर	4
3	ठाणे	12
4	पालघर	8
5	रायगड	3
	एकूण	28

- वरीलप्रमाणे समितीमधील एकूण 28 तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करुन नियमोचित कार्यवाही करावी व **जिल्हास्तरीय समितीमार्फत केलेल्या कार्यवाहीनुसार निकाली काढलेल्या तक्रारींबाबत सविस्तर कार्यवाहीचा अहवाल इतिवृत्तांमध्ये नोंद घेऊन विभागीय आयुक्त स्तरावरील समितीच्या सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांचेकडे बैठकीपूर्वी पाठविण्याच्या सूचना दिल्या.**

	आयत्या वेळेचे विषय		
1	**पाणथळ तक्रार निवारण समितीच्या सदस्यांच्या बैठकीच्या उपस्थितीबाबत**	मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण यांनी समितीचे कामकाज नियमितपणे व गांभीर्याने पार पाडण्यासाठी तसेच प्रलंबित तक्रारींचा कालबद्ध पद्धतीने निपटारा करण्यासाठी, समितीच्या सर्व सदस्यांनी पाणथळ क्षेत्रांशी संबंधित विषयांची माहिती असलेल्या संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीस प्राधान्याने उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे, असे निर्देश देण्यात आले.	सर्व संबंधित समितीचे सदस्य

2	पाणथळ क्षेत्रांवरील डेब्रिज/भराव हटविणे व पाणथळ क्षेत्रांच्या पुनर्स्थापनेसाठी (Restoration) निधी उपलब्ध करून देण्याबाबत.	पाणथळ क्षेत्रांमधील डेब्रिज/भराव काढणे तसेच पाणथळ क्षेत्रांचे Restoration करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याचे संचालक, वनशक्ती यांनी नमूद केले. या संदर्भात तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी नगरविकास विभागास याबाबत पत्रव्यवहार केला असून यावर पुन्हा स्मरणपत्र देण्याची आवश्यकता असल्याचे संचालक, वनशक्ती यांनी सांगितले. त्या अनुषंगाने नगरविकास विभागास यापूर्वी देण्यात आलेल्या पत्रास पुनःस्मरणपत्र देण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या स्तरावरून केली जाईल. असे सांगितले.	नगर विकास विभाग

(रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग